# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२४/सुचना क्र.०१/कृषी/CAP/११६३,  दिनांक : १५/०७/२०२४

## जाहीर सुचना

### सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेबाबत...

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी कृषी शिक्षण विभागांतर्गत कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या ऑनलाईन केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसाठी प्रवेश अर्ज नोंदणीस दिनांक ०४/०७/२०२४ पासून सुरुवात झाली असून अर्ज नोंदणीचा अंतिम दिनांक १५/०७/२०२४ असा असून त्यास दिनांक २२/०७/२०२४ रोजीपर्यंत खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| Activity | First Date | Last Date | Extended Last Date |
|---|---|---|---|
| Online registration of application & uploading of documents by candidate for admission on website | 04/07/2024 | 15/07/2024 | 22/07/2024 |

उपरोक्त वाढीव मुदतीनुसार उमेदवारांनी त्यांचा प्रवेश अर्ज विहीत मुदतीत भरावा. मुदतवाढीचे सविस्तर वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळ www.mahacet.org वर प्रसिध्द् करण्यात येईल.

सही/-
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**(राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जाहीर सूचना क्र.रासाप्रपक/कृशिप्र-१३२४/सूचना क्र.०१/कृषी/CAP/११६३ दि.१५/७/२०२४ शी संबंधित)**

## पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०२४-२५ साठीचे सुधारीत वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबत आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक. | १५-०७-२०२४ | २२-०७-२०२४ |
| २. | अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १९-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) | २६-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| ३. | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा कालावधी | २०-०७-२०२४ ते २२-०७-२०२४ | २७-०७-२०२४ ते २९-०७-२०२४ |
| ४. | विचारात घेण्यात आलेल्या तक्रारींच्या यादीची प्रसिध्दी | २३-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) | ३०-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| ५. | अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २४-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर)# | ३१-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर)# |
| ६. | पहिल्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांची प्रसिध्दी | २४-०७-२०२४ | ३१-०७-२०२४ |
| ७. | पहिल्या प्रवेश फेरीकरिता महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे | २५-०७-२०२४ | ०१-०८-२०२४ व ०२-०८-२०२४ |
| ८. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २७-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) | ०४-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २८-०७-२०२४ ते ३०-०७-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | ०५-०८-२०२४ ते ०७-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| ९. | पहिल्या फेरीद्वारे प्रवेशित शेवटच्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय गुणांचा तपशील (last merit / cutt off) व दुसऱ्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांची प्रसिध्दी | ३१-०७-२०२४ (सकाळी ९.०० वाजता) | ०८-०८-२०२४ (सकाळी ९.०० वाजता) |
| १०. | दुसऱ्या प्रवेश फेरीकरिता महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे | ३१-०७-२०२४ | ०८-०८-२०२४ व ०९-०८-२०२४ |
| ११. | (i) दुस-या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | ०२-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) | ११-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०३-०८-२०२४ ते ०५-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | १२-०८-२०२४ ते १४-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| १२. | दुसऱ्या फेरीद्वारे प्रवेशित शेवटच्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय गुणांचा तपशील (last merit / cutt off) व तिसऱ्या प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांची प्रसिध्दी | ०६-०८-२०२४ (सकाळी ९.०० वाजता) | १६-०८-२०२४ (सकाळी ९.०० वाजता) |

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १३. | तिसऱ्या प्रवेश फेरीकरिता महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे | ०६-०८-२०२४ | १६-०८-२०२४ व १७-०८-२०२४ |
| १४. | (i) तिस-या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रूपांतरासह) | ०८-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) | १९-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०९-०८-२०२४ ते ११-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | २०-०८-२०२४ ते २२-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| १५. | 'ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्याचा कालावधी. (सूचनाः- ज्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र हया प्रमाणपत्रांच्या ऐवजी पावती अपलोड केलेली असेल, अशा उमेदवारांनी या कालावधीत सदरचे मूळ प्रमाणपत्र त्यांच्या लॉगइनद्वारे अपलोड करावे. तसेच उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले असल्यास संबंधित उमेदवाराने महाविद्यालयातसुध्दा सदरचे प्रमाणपत्र जमा करावे.) | ०९-०८-२०२४ ते १२-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | २०-०८-२०२४ ते २३-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| १६. | 'केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी'साठी उपलब्ध जागांचा तपशील तसेच केंद्रीभूत प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेशित शेवटच्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय गुणांच्या तपशीलाची (last merit / cutt off) प्रसिध्दी | १३-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) | २४-०८-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| १७. | रिक्त जागांकरिता 'केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी' | १६-०८-२०२४ ते २१-०८-२०२४ | २६-०८-२०२४ ते ३१-०८-२०२४ |
| | (**परिशिष्ट 'एच'** मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'प्रवेश प्रक्रिया केंद्रा'वर व **परिशिष्ट 'आय '** येथील कार्यपध्दतीनुसार) | | |

| **दिनांक** | **अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)** |
|---|---|
| २६-०८-२०२४ | ८५ व त्यापेंक्षा अधिक |
| २७-०८-२०२४ | ६५ व त्यापेंक्षा अधिक |
| २८-०८-२०२४ | ५० व त्यापेंक्षा अधिक |
| २९-०८-२०२४ | ३५ व त्यापेंक्षा अधिक |
| ३०-०८-२०२४ | सर्व पात्र उमेदवार. |
| ३१-०८-२०२४ | सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) |

| अ. क्र. | कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १८. | **महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी (परिशिष्ट 'जे' मध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार)** | २३-०८-२०२४ ते २६-०८-२०२४ | ०२-०९-२०२४ ते ११-०९-२०२४ |
| १९. | **संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक** | | |
| | (i) संबंधित संस्था / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर महाविद्यालयनिहाय उपलब्ध जागांची प्रसिध्दी | १७-०८-२०२४ | २७-०८-२०२४ |
| | (ii) संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे व्यक्तीशः प्रवेशाकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी | १८-०८-२०२४ ते २०-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | २८-०८-२०२४ ते ०२-०९-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| | (iii) संबंधित संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर गुणवत्ता यादी / निवड यादीची प्रसिध्दी. | २१-०८-२०२४ (सायं. ५.३० पर्यंत) | ०३-०९-२०२४ (सायं. ५.३० पर्यंत) |
| | (iv) निवड यादीतील उमेदवारांनी प्रवेश घेण्यासाठी, संबंधित संस्था / महाविद्यालयाकडे मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्काच्या धनाकर्षासह उपस्थित राहण्याचा कालावधी | २२-०८-२०२४ व २३-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | ०४-०९-२०२४ व ०७-०९-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| | (v) निवड यादीतील उमेदवार विहित कालावधीमध्ये उपस्थित नसल्यास, रिक्त असणाऱ्या जागा वरील क्र. (iii) येथील गुणवत्ता यादीतील उमेदवार तसेच सद्यस्थितीत प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जामधून गुणवत्तेने भरण्याचा कालावधी. | २४-०८-२०२४ ते २६-०८-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | ०८-०९-२०२४ ते ११-०९-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| २०. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १६-०८-२०२४ | २६-०८-२०२४ |
| २१. | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | २६-०८-२०२४ | ११-०९-२०२४ |

#सदर दिनांकानंतर आणि संस्थात्मक कोटयातील प्रवेश प्रक्रिया चालू असेपर्यंत म्हणजेच दि.११/०९/२०२४ पर्यंत सुध्दा ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करता येईल. मात्र या कालावधीत दाखल करण्यात आलेले पात्र प्रवेश अर्ज केवळ संस्थात्मक कोटयातील प्रवेशाकरिता ग्राह्य असतील.

**Updated Agriculture and Agriculture Allied (9) courses for Academic Year 2024-25**

| Sr. No. | Programme | Date | Revised Schedule |
|---|---|---|---|
| 1 | Last date of Centralised Admission Process submitting the application form along with uploading scanned copies of the necessary documents on website | 15/07/2024 | 22/07/2024 |
| 2 | Display of PROVISIONAL MERIT LIST on website | 19/07/2024 (After 5.30 pm) | 26/07/2024 (After 5.30 pm) |
| 3 | Period of receipt of Online grievances. | 20/07/2024 to 22/07/2024 | 27/07/2024 to 29/07/2024 |
| 4 | Display of List of Grievances considered | 23/07/2024 (After 5.30 pm) | 30/07/2024 (After 5.30 pm) |
| 5 | Display of **FINAL MERIT LIST** | 24/07/2024# (After 5.30 pm) | 31/07/2024# (After 5.30 pm) |
| 6 | Display of available seats for first round | 24/07/2024 | 31/07/2024 |
| 7 | Submission of college preferences for first round | 25/07/2024 | 01/08/2024 & 02/08/2024 |
| 8 | (i) Display of **First Round allotment** list | 27/07/2024 (After 5.30 pm) | 04/08/2024 (After 5.30 pm) |
| | (ii) Period of reporting | 28/07/2024 to 30/07/2024 (9.00 am to 6.00 pm) | 05/08/2024 to 07/08/2024 (9.00 am to 6.00 pm) |
| 9 | Display of collegewise and categorywise last merit / cut off after admitted candidates of first round and display of available seats for second round | 31/07/2024 (9.00 am) | 08/08/2024 (9.00 am) |
| 10 | Submission of college preferences for second round | 31/07/2024 | 08/08/2024 & 09/08/2024 |
| 11 | (i) Display of **Second Round allotment** list | 02/08/2024 (After 5.30 pm) | 11/08/2024 (After 5.30 pm) |
| | (ii) Period of reporting | 03/08/2024 to 05/08/2024 (9.00 am to 6.00 pm) | 12/08/2024 to 14/08/2024 (9.00 am to 6.00 pm) |

<table>
<tr><th>Sr. No.</th><th colspan="2">Programme</th><th>Date</th><th>Revised Schedule</th></tr>
<tr><td>12</td><td colspan="2">Display of Collegewise and categorywise last merit / cut off after admitted candidates of second round and display of available seats for third round</td><td>06/08/2024<br>(9.00 am)</td><td>16/08/2024<br>(9.00 am)</td></tr>
<tr><td>13</td><td colspan="2">Submission of college preferences for third round</td><td>06/08/2024</td><td>16/08/2024<br>&<br>17/08/2024</td></tr>
<tr><td rowspan="2">14</td><td colspan="2">(i) Display of Third Round allotment list (Conversion)</td><td>08/08/2024<br>(After 5.30 pm)</td><td>19/08/2024<br>(After 5.30 pm)</td></tr>
<tr><td colspan="2">(ii) Period of reporting</td><td>09/08/2024<br>to<br>11/08/2024<br>(9.00 am to 6.00 pm)</td><td>20/08/2024<br>to<br>22/08/2024<br>(9.00 am to 6.00 pm)</td></tr>
<tr><td>15</td><td colspan="2">Period for submission of original documents and required fees by candidates in concern college admitted through online admission allotment round ( Those who have submitted receipt of Caste/Tribe Validity Certificate, Non-Creamy Layer Certificate and Economically Weaker Section Certificate, they must upload original certificate by login their own ID and also submit original certificates in respective college )</td><td>09/08/2024<br>to<br>12/08/2024<br>(9.00 am to 6.00 pm)</td><td>20/08/2024<br>to<br>23/08/2024<br>(9.00 am to 6.00 pm)</td></tr>
<tr><td>16</td><td colspan="2">Display of vacant positions for Centerwise Centralised Admission round and Collegewise & categorywise last merit / cutt off</td><td>13/08/2024<br>(After 5.30 pm)</td><td>24/08/2024<br>(After 5.30 pm)</td></tr>
<tr><td rowspan="9">17</td><td colspan="2">Centerwise Centralised Admission process for vacant seats</td><td>16/08/2024<br>to<br>21/08/2024</td><td>26/08/2024<br>to<br>31/08/2024</td></tr>
<tr><td colspan="2">As per Admission Process Centre indicated in <u>APPENDIX ‘H’</u> and as per procedure given in <u>APPENDIX ‘I’</u></td><td rowspan="8"></td><td rowspan="8"></td></tr>
<tr><td>Date</td><td>Percentage/Percentile in merit list<br>(with weightages)</td></tr>
<tr><td>26/08/2024</td><td>85 and above</td></tr>
<tr><td>27/08/2024</td><td>65 and above</td></tr>
<tr><td>28/08/2024</td><td>50 and above</td></tr>
<tr><td>29/08/2024</td><td>35 and above</td></tr>
<tr><td>30/08/2024</td><td>All eligible candidates</td></tr>
<tr><td>31/08/2024</td><td>All eligible candidates (With conversion)</td></tr>
<tr><td>18</td><td colspan="2">College level admission round as per procedure given in <u>APPENDIX ‘J’</u></td><td>23/08/2024<br>to<br>26/08/2024</td><td>02/09/2024<br>to<br>11/09/2024</td></tr>
<tr><td rowspan="2">19</td><td colspan="2">Time Table for Filling Institutional Quota</td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">(i) The list of college-wise vacant seats will be displayed on web site</td><td>17/08/2024</td><td>27/08/2024</td></tr>
</table>

| Sr. No. | Programme | Date | Revised Schedule |
|---|---|---|---|
| | (ii) Period for Submission of application to respective institute inperson. | 18/08/2024 to 20/08/2024 (9.00 am to 6.00 pm) | 28/08/2024 to 02/09/2024 (9.00 am to 6.00 pm) |
| | (iii) Publication of Merit List / Selection List on the Notice Board of respective institute and website of respective institute. | 21/08/2024 (upto 5.30 pm) | 03/09/2024 (upto 5.30 pm) |
| | (iv) Last date for selected candidates to report respective institute with all original documents and Demand Draft of requisite fees for admission. | 22/08/2024 and 23/08/2024 (9.00 am to 6.00 pm) | 04/09/2024 and 07/09/2024 (9.00 am to 6.00 pm) |
| | (v) Period for Filling of vacant seats from merit list mentioned in Sr. No.(iii), if candidates from selection list will not reported in stipulated time period | 24/08/2024 to 26/08/2024 (9.00 am to 6.00 pm) | 08/09/2024 to 11/09/2024 (9.00 am to 6.00 pm) |
| 20 | Commencement of Classes | 16/08/2024 | 26/08/2024 |
| 21 | Cut off Date for Admission | 26/08/2024 | 11/09/2024 |

# Online application can submit till admission process of institutional quota (i.e. 11/09/2024). But submitted eligible application in this period is valid for admission in institutional quota only.

NOTE-
will be sent to the candidates as the admission schedule is notified as above.

## <u>परिशिष्ट ‘आय ’</u>

## <u>केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीची कार्यपध्दती (सुधारीत)</u>

केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. २६/०८/२०२४ ते ३१/०८/२०२४ या कालावधीत प्रवेश प्रक्रिया केद्रांवर खालील कार्यपध्दतीने केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर दि. २४/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी फक्त ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांच्या ठिकाणी केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर ज्या ज्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील परिशिष्ट **<u>‘एच ’</u>** मध्ये देण्यात आला आहे.

(२) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाशी संबंधित ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर दि.२६/०८/२०२४ ते ३१/०८/२०२४ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे. खाली दर्शविलेल्या गुणवत्तेप्रमाणे प्रवेश प्रक्रिया केंद्रावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

| **दिनांक** | **अंतिम गुणवत्ता यादीतील यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारासह)** |
|---|---|
| २६-०८-२०२४ | ८५ व त्यापेंक्षा अधिक |
| २७-०८-२०२४ | ६५ व त्यापेंक्षा अधिक |
| २८-०८-२०२४ | ५० व त्यापेंक्षा अधिक |
| २९-०८-२०२४ | ३५ व त्यापेंक्षा अधिक |
| ३०-०८-२०२४ | सर्व पात्र उमेदवार. |
| ३१-०८-२०२४ | सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) |

(३) ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’नी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. अशा उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’स दोन तासाच्या कालावधीत म्हणजेच दुपारी १.३० पर्यंत पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

(४) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील

प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या' शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि.** ३१/०८/२०२४ **रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी घ्यावी.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'च्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

**(६)** 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(७) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

(८) 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(९) केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

(१०) प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.

## परिशिष्ट 'जे'

## महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीची कार्यपध्दती (सुधारीत)

प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतरही जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ०२-०९-२०२४ ते ११-०९-२०२४ (प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत) या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या थेट द्वितीय वर्षातील पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) प्रत्येक महाविद्यालयाच्या ठिकाणी त्या महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्यासाठी महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

(२) पात्र उमेदवारांनी त्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाकडे अर्ज करावा व त्या महाविद्यालयात दि०२-०९-२०२४ ते ११-०९-२०२४ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उपस्थित राहावे.

(३) उपलब्ध जागांवरील प्रवेश हे पारदर्शक रितीने आणि ज्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पडताळणीसाठी व नंतर महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी अर्ज सादर केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार करावेत व **महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे प्रवेश दिल्याची नोंद करावी.**

(४) संस्था / महाविद्यालयाने, महाविद्यालयस्तरीय रिक्त जागा व वरीलप्रमाणे प्राप्त प्रवेश अर्जांची गुणवत्ता यादी, संस्थेच्या / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करावी.

(५) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील रिक्त जागा ज्या प्रवर्गाची आहे, त्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधूनच ती जागा भरण्यात यावी. तद्नंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.११/०९/२०२४ रोजी विहित पध्दतीने (शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रवेश कार्यपध्दतीने) जागा रूपांतरीत करून भरण्यात याव्यात.

(६) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र ही प्रमाणपत्रे दि. २३/०८/२०२४ हया मुदतीत निर्गमित झालेली असावीत. यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य नसतील.

(७) प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराची मूळ कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची महाविद्यालयाने खातरजमा करावी.

(८) महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांकडून रु.१०००/- 'जागा स्वीकृती शुल्क' महाविद्यालयांनी प्राप्त करावे व प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनाप्रमाणे सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावे.

(९) महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही. याची माहिती महाविद्यालयांनी / संस्थांनी संबंधित प्रवेशोच्छुक उमेदवारास द्यावी. सदरील उमेद्वार शिष्यवृत्ती मागणार नाही, असे हमी पत्र उमेदवाराकडून लेखी स्वरूपात घेण्यात यावे.

(१०) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** महाविद्यालयांनी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित महाविद्यालयाकडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल. यासाठी संकेतस्थळावर महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

(११) महाविद्यालयाने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

(१२) प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.